नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५६ Issue - 56 | वार रविवार दि. १३ जुलै २०२५ Blow- Sunday Date 13 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात पुढील सात दिवसात अतिमुसळधार पावसाचा इशारा

### हवामान विभागाचा अंदाज; विश्रांती घेतलेला पाऊस पुन्हा हजेरी लावणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या महिनाभरात देशाच्या अनेक भागांत पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. काही राज्यांमध्ये तर पावसाने रौद्ररुप दाखवले असून पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरं जावं लागत आहे. सततच्या पावसामुळे तापमान घसरले असून हवेतील आद्रताही कमी झाली आहे. परंतु पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाकडून पुन्हा एकदा देशभरात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आयएमडीने दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील सहा दिवस अनेक राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार, अनेक राज्यांमध्ये पुढील ६ दिवस मुसळधार पावसाची शक्यता आहे. १२ ते १७ जुलैदरम्यान हवामान विभागाकडून या राज्यांना पावसाचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये पाच दिवस अतिवृष्टीची शक्यता आहे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमधील जवळपास सर्वच जिल्ह्यांत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जम्मू काश्मीरमध्ये पुढील तीन दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हरियाणाच्या काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार तर काही जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम सरी बरसण्याची शक्यता आहे.

तर महाराष्ट्र, गोवा आणि गुजरातमध्ये पुढील सात दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, आसाम, अरुणाचल प्रदेश सिक्किम, छत्तीसगड, मध्यप्रदेश, मेघालय आणि ओडिशा या राज्यांतही मुसळधार पावसाची शक्यता आहे. आयएमडीकडून या राज्यांना अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्रालाही पावसाचे ढग वेढणार आहेत. गेले काही दिवस विश्रांती घेतलेला पाऊस पुन्हा हजेरी लावण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात कोकण आणि विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे आहे. तर मराठवाड्यात पावसाचं प्रमाण कमी होतं, मात्र गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यातील ही कमतरता देखील पावसाने भरून काढली आहे, दुसरीकडे विदर्भात मात्र पावसामुळे मोठे नुकसान झाल्याचे चित्र आहे. पुढील सात दिवस महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांचा आंतरराष्ट्रीय गौरव प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारताच्या शौर्यशाली इतिहासाचा आणि सांस्कृतिक वैभवाचा गौरव करणाऱ्या 'मराठा सैन्य लँडस्केप्स' ला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. या ऐतिहासिक यशामुळे मराठा साम्राज्याच्या रणनीतिक, स्थापत्य आणि ऐतिहासिक महत्त्वाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. सर्व नागरिकांना या किल्ल्यांना भेट देण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल अभिमान व्यक्त करताना म्हटले, मराठा साम्राज्याचा उल्लेख होताच सुशासन, सैन्यशक्ती, सांस्कृतिक गौरव आणि सामाजिक कल्याणाचा आदर्श डोळ्यासमोर येतो. या महान शासकांनी अन्यायाविरुद्ध न झुकण्याची प्रेरणा आपल्याला दिली आहे. त्यांनी २०१४ मध्ये रायगड किल्ल्याला दिलेल्या भेटीची आठवण सांगताना म्हटले, रायगडावरील ती भेट माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. तिथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याची संधी मिळाली. त्यांनी सर्व नागरिकांना या किल्ल्यांना भेट देऊन मराठा इतिहासाची माहिती घेण्याचे आवाहन केले.

या यादीत मराठा साम्राज्याच्या १२ भव्य किल्ल्यांचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ११ किल्ले-रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी आणि तमिळनाडूतील एक किल्ला-जिंजी यांचा समावेश आहे. या किल्ल्यांना 'मराठा सैन्य लँडस्केप्स' या संकल्पनेअंतर्गत 'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मराठा स्थापत्यशास्त्रातील माची स्थापत्य, जे गडाच्या सुरक्षिततेसाठी आणि युद्धकौशल्यासाठी अद्वितीय आहे, याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. हे स्थापत्य जगातील इतर कोणत्याही किल्ल्यांमध्ये आढळत नाही.

**महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारचे योगदान**

या यशामागे केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाचे एकत्रित प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले. पंतप्रधान मोदी यांच्या पाठिंब्याने आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (डख) तसेच संस्कृती मंत्रालयाच्या सहभागाने हा टप्पा गाठता आला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या यशासाठी पंतप्रधान मोदी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, अपर मुख्य सचिव विकास खारगे, भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल शर्मा आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे हेमंत दळवी यांचे आभार मानले आहेत. शेलार यांनी युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेऊन तांत्रिक सादरीकरण केले, ज्यामुळे या यशाला गती मिळाली.

## बुलढाण्यात गर्भपात करणाऱ्या बोगस डॉक्टरच्या रुग्णालयात वैद्यकीय पथकाचा छापा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बुलढाणा : जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील रायपूर येथे एक बोगस डॉक्टरचा पर्दाफाश झाला असून आयुर्वेदिक डॉक्टरच्या रुग्णालयात अवैध गर्भपात करत असताना जिल्हा शल्य चिकित्सकांनी छापा मारला. गर्भपातासंदर्भातील कुठलीही परवानगी आणि शैक्षणिक अर्हता नसताना येथील डॉक्टर महोदयांकडून अवैधपणे गर्भपात करण्यात येत होता. यासंदर्भात माहिती मिळाल्यानंतर थेट जिल्हा शल्य चिकित्सकांनीच रुग्णालयात धाड टाकली. त्यानंतर, रायपूर येथील डॉ. उज्वल खंडागळे यांच्या खंडागळे हॉस्पिटल वर जिल्हा शल्य चिकित्सकांची झझझछऊ कायद्यअंतर्गत मोठी कारवाई केली आहे. या कारवाई दरम्यान भ्रूण अवशेष मिळाल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्तात्रय बिराजदार यांनी दिली.

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील रायपूर या गावात उज्वल खंडागळे या आयुर्वेदिक डॉक्टरच्या खंडागळे हॉस्पिटल या रुग्णालयावर गोपनीय माहितीच्या आधारे अवैध गर्भपात करत असताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व पथकाने छापा टाकला. यावेळी, सदर डॉक्टरला गर्भपात करताना रंगेहात पकडण्यात आल्याने जिल्ह्याच्या वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. यावेळी या डॉक्टरकडे कुठलीही गर्भपात करण्याची परवानगी अथवा शैक्षणिक अहर्ता नसल्याचं तपासात आढळून आलं. वैद्यकीय पथकाने पोलिसांच्या मदतीने तपासणी केली असता भ्रूणहत्येचे अनेक अवशेष आणि एक संपूर्ण भ्रूण याठिकाणी सापडलं आहे. त्यामुळे, जिल्हा शल्य चिकित्सकांनी झझझछऊ कायद्याअंतर्गत कारवाई करत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी करण्यात आलेली कारवाई ही अलीकडच्या काळातील सर्वात मोठी कारवाई मानल्या जात आहे. हा डॉक्टर किती वर्षापासून भ्रूणहत्या, अवैधपणे गर्भपात करत होता? याची चौकशी आता पथक व पोलीस करत आहेत.

## जात धर्म न पाहता किल्ल्यांवरची ती बांधकामे पाडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या किल्ल्यांच्या इतिहासाची साक्ष आता जगाला मिळणार आहे. युनेस्कोने महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ अशा एकूण १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसंच राज्य सरकारला सावध करत राज यांनी एक आवाहनही केलं आहे.

सरकारला एक आठवण करून द्यावीशी वाटते ती म्हणजे युनेस्कोने जागतिक वारसा दर्जा दिला म्हणून युनेस्कोसारख्या संस्थांना गृहीत धरता येत नाही. जर निकष नीट नाही पाळले तर युनेस्को हा दर्जा काढून घेतं, याची आत्तापर्यंतची दोनच उदाहरणं आहेत पण ती आहेत हे विसरू नका. एक उदाहरण आहे ओमानमधल्या आवरिक्स अभयारण्याचं आणि दुसरं उदाहरण आहे ड्रेस्डन व्हॅलीचं. जर्मनीतील ड्रेस्डन व्हॅलीला जागतिक वारसा दर्जा मिळाला पण निकष न पाळल्याने तो २००९ ला काढून घेतला. यामुळे सरकारने फक्त आनंद साजरा करू नये तर एका मोठ्या जबाबदारीचं भान देखील बाळगावं. तसेच सर्वप्रथम या सर्व गडकिल्ल्यांवरची जी काही अनधिकृत बांधकामं आहेत ती तात्काळ पाडून टाका. त्यात जात-धर्म पहाण्याची गरज नाही, असं आवाहन राज ठाकरेंनी केलं आहे.

महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांचा दर्जा दिला आहे. ही अतिशय आनंदाची बाब आहे. या १२ किल्ल्यांमध्ये ११ किल्ले महाराष्ट्रातील आहेत आणि एक किल्ला जिंजीचा किल्ला तामिळनाडू मधला आहे. या निमित्ताने महाराजांनी रुजवलेला स्वराज्याचा विचार कुठवर पोहचला होता हे महाराष्ट्राचं कर्तृत्व यावर बोलणाऱ्यांना हे कळेल आणि महाराष्ट्र ते थेट दक्षिणेत तामिळनाडूपर्यंत दोन भाषांचा आणि संस्कृतींचा सेतुबंध किती जुना आणि मजबूत आहे हे पण कळेल, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी सोशल मीडियातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

**सरकारला सावध करत राज ठाकरेंची मोठी मागणी**

राज ठाकरे पुढे म्हणाले की, या निमित्ताने महाराजांच्या या महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचं किमान नीट संवर्धन होईल अशी अपेक्षा. एकदा युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला की त्या वास्तूचं संवर्धन, नूतनीकरण याचे खूप कडक निकष असतात ते पाळावे लागतील, पण त्यामुळे किमान महाराजांचे किल्ले तरी नीट राखले जातील. आता राज्य सरकारला या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध होईल आणि राज्याने देखील उत्तम निधी उपलब्ध करून द्यावा. आत्तापर्यंतच्या एकूण एक सरकारांनी गडकिल्ल्यांची जी दुरवस्था करून ठेवली होती त्यामुळे जगाला बोलावून हे किल्ले दाखवावे, आपल्या महाराजांचं, महाराष्ट्राचं वैभव दाखवावं अशी परिस्थिती नव्हती, ती आता बदलेल अशी आशा व्यक्त करतो. मी आम्ही हे गेली अनेक वर्षे म्हणत आलो आहे की महाराजांनी उभारलेले किल्ले आणि महाराष्ट्राला लाभलेली किनारपट्टी याचं नीट जतन केलं आणि तिथे पर्यटनासाठी योग्य पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या तरी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कुठच्या कुठे निघून जाईल, असं मत राज यांनी व्यक्त केला आहे.

**प्रदेशाध्यक्षपदाबाबत जितेंद्र आव्हाडांनी स्पष्टच सांगितलं** | **पक्षात कोणतीही नाराजी नाही**

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांच्या राजीनाम्याचा मोठा सस्पेन्स

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. तत्पूर्वी राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष पदातून मुक्त करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. पवार साहेबांनी मला भरपूर संधी दिल्या, तब्बल सात वर्षे मी या पदावर काम केले. आता नव्या चेहऱ्यांना संधी देणं गरजेचं आहे. तुमच्यासमोरच मी साहेबांना विनंती करतो, अशी भावनिक सादही पाटील यांनी घातली होती.

त्यानंतर, आता जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा शरद पवारांकडे दिला असून १५ जुलै रोजी नवीन प्रदेशाध्यक्ष ठरला जाईल, नव्या नावाची घोषणा होईल, असे समजते. मात्र, जयंत पाटलांच्या राजीनाम्याचे वृत्त खोडसाळपणाचे आहे, असे पक्षाचे राष्ट्राय प्रवक्ते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं. त्यामुळे, राजीनाम्याचा सस्पेन्स वाढला आहे.



जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत बोलताना शशिकांत शिंदे म्हणाले की, प्रदेशाध्यक्षपदाबाबत अजून नाव निश्चित नाही, पवार साहेब, सुप्रिया ताई, जयंत पाटील आणि पक्ष जो निर्णय घेईल तो मान्य असेल. १५ तारखेला पक्षाची बैठक आहे, काही नावं चर्चेत आहेत, माझंही नाव चर्चेत आहेत. ज्यावेळेला निर्णय होईल, निवड होईल त्यावेळी निश्चितपणानं काम करू, असं शशिकांत शिंदे म्हणाले. मात्र, जयंत पाटलांच्या राजीनाम्याचे वृत्त आमदार जितेंद्र आव्हाड यांनी फेटाळलं आहे.

पक्षात कोणतीही नाराजी नाही

जयंत पाटील यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या राजीनाम्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर जितेंद्र आव्हाड यांनी हे वृत्त फेटाळलं आहे. जी माहिती तुम्हाला मिळाली आहे ती मला मिळाली नाही, पक्षाची एक पद्धत असते. पक्षाची बैठक होऊन त्याच्यात निर्णय घेतला जातो असे त्यांनी म्हटले. तसेच, पक्षात कोणतीही नाराजी नाही, शशिकांत शिंदे हे प्रदेशाध्यक्ष होणार आहेत, हे तुमच्याकडून मला कळत आहे. पवार साहेब हे विश्वासात घेऊन, बैठक घेऊन असे निर्णय घेत असतात, असेही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं. मा. जयंत पाटील साहेब हे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या प्रसारीत होणे, हा निव्वळ खोडसाळपणा आहे. पक्ष एका नियमानुसार अन् शिस्तीनुसारच चालत असतो, असे म्हणत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राजीनाम्याचे वृत्त फेटाळलं आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रदेशाध्यक्षपदाचा सस्पेन्स कायम आहे. विशेष म्हणजे दुसरीकडे रोहित पवारांनी राजीनाम्याचे वृत्त मान्य करत नवीन प्रदेशाध्यक्ष १५ जुलै रोजी जाहीर होईल, ते नाव जयंत पाटील हेच जाहीर करतील, असे म्हटलं आहे.

## वकिलांचे उपोषणास मनसेचा जाहीर पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

वकील संरक्षण कायदा लागू करण्यात यावा या मागणीसाठी पंढरपुरात पंढरपूर बाराशेच्या सदस्य अँड प्रताप शेळके होऊ शक्तिमान माने यांनी पोषण सुरू केले आहे या उपोषण स्थळास भेट देऊन मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी मनसेच्या उपोषणास जाहीर पाठिंबा दिला आहे.



विविध कारणाने वकिलावर हल्ली केले जात आहेत त्यामुळे वकिलामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे शासनाने वकील संरक्षण कायदा लागू करावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत आहे मात्र याकडे शासन दुर्लक्ष करत आहे त्यामुळे पंढरपूर येथील न्यायालयाच्या गेट समोर पंढरपूर चे बार सदस्य अँड प्रताप शेळके व अँड शक्तिमान माने यांनी अमरण उपोषण सुरू केले आहे या उपोषणास स्थळास मनसेचे नीती दिलीप धोत्रे यांनी भेट देऊन वकिलांना पाठिंबा दिला असल्याचे जाहीर केले आहे यावेळी सोलापूरची प्रसिद्ध अँड मिलिंद थोबडे अँड राजेश चौगुले अँड संदीप ननवरे आधी जण उपस्थित होते.

## सदलापूर कन्नड शाळेची शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शैक्षणिक वर्ष २४ -२५ या वर्षी घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी जि.प प्राथमिक कन्नड शाळा सदलापूर ता. अक्कलकोट या शाळेचे पाच विद्यार्थी परीक्षेत बसले होते त्यापैकी पाचही विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत.

शाळेचा १००% निकाल लागला आहे व गुणवत्ता यादीत आलेले आहेत त्यामुळे केंद्रात व आजूबाजूच्या गावात कन्नड शाळेचे नाव कौतुक होत आहे या यशाचे पाठीमागे वागदरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री बसवराज मुनोळी सर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच शाळेचे मुख्याध्यापक अशोक पोमाजी सर व महंमदहयात अब्दुलनबी पाटील सर व वर्गशिक्षक श्री धरेप्पा कटगेरी सर सौ सुदेवी भिमाशंकर किरनळळी म्याडम यांचे मार्गदर्शन लाभले,तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्याचे मार्गदर्शन लाभले.

गुणवत्ताधारक विद्यार्थी चे नाव कु -गौरी मल्लाप्पा लोहार, कु -काशिनाथ श्रीकांत गायकवाड, कु -सरस्वती शिवानंद गवळी, कु -रायप्पा गजानंद गवळी, कु -पृथ्वी बलवंत बजे या यशामुळे सगळीकडे कौतुक होत आहे.

गावातील पालकांकडून शुभेच्छा देण्यात आले.








# आषाढी एकादशी निमित्ताने श्री समर्थ कृपा भजन मंडळाचा भव्य-दिव्य दिंडी सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : प्रतिवर्षेप्रमाणे श्री समर्थ कृपा भजन मंडळ गाडीची वेळ सकाळी ९.४३ विरार ते चर्चगेट उपरोक्त मंडळाचा भव्य दिव्य दिंडी सोहळा साई दत्त मंदिर,नालासोपारा ( पूर्व ) येथे रविवार दि.०६ जून २०२५ रोजी संपन्न झाला.उपरोक्त मंडळ गेली १५ वर्ष अविरतपणे आषाढी एकादशी सोहळा व भव्य-दिव्य दिंडी सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करत असते.

ह्या सोहळ्यास पोलिस कर्मचारी डि.पी सांगळे यांच्या उपस्थितीत पालखी पुजन करून सोहळ्यास सुरूवात करण्यात आली.या सोहळ्यासाठी पोलिस कर्मचारी घरत साहेब,सांगळे साहेब तसेच महिला पोलिस कर्मचारी यांनी दिंडी सोहळाचा आनंद घेतला. ह्या दिंडी सोहळ्यात श्रद्धा सबुरी भजन मंडळ यांची प्रमुख उपस्थिती सातत्याने गेले २५ वर्ष अखंड दिडी सोहळ्याचे नियोजन करत असतात. त्याच प्रमाणे त्रिमूर्ती भजन मंडळ या ही मंडळाने उपस्थित राहुन साई दत्त मंदीर मधे पांडुरंगाचा जयघोष करत ज्ञानोबा,तुकाराम गजराने अगदी परिसर मंत्र मुग्ध होऊन गेला. ह्या सोहळ्यास सुमधुर आवाजाचे गायक अनंत शेनॉय माऊली उपस्थित होते.श्री समर्थ कृपा भजन मंडळाच्या नियोजित सोहळ्यास दोन्ही मंडळानी साई दत्त मंदीर मधे आजूबाजूच्या परिसरात हरिनामाचा जयघोष करूण अनेक परिसरातील श्रोते वर्गास पंढरपूर आषाढी एकादशी यांची जाणीव करून लहान- थोर मंडळींना भगवंताच्या नामस्मरणाने प्रेरित करून टाकले.तसेच ह्या विभागाचे विभाग प्रमुख जितेंद्र हजारे यांनी श्री समर्थ कृपा भजन मंडळ व श्रद्धा सबुरी भजन मंडळ ह्या दोन्ही मंडळाच्या पालखी दिंडी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत केले. अनेक भाविकांनी ह्या सोहळ्याचा आनंद घेतला.श्री समर्थ कृपा भजन मंडळ व श्रद्धा सबुरी भजन मंडळ ह्या दोन्ही भजन मंडळांचा सर्वांनाकडुन कौतुकास्पद अभिनंदन होत आहे.संस्थापक- ह.भ.प.विश्वनाथ बांद्रे, अध्यक्ष-अरविंद मोरे, उपाध्यक्ष -राजेश येले, खजिनदार- जनार्दन शिंदे, सचिव-गजानन जोशी, कार्याध्यक्ष - प्रनव लांबाडे, सहसचिव- अनिल बेकरे, सहखजिनदार - राजु दादा पाडावे. उपस्थित सर्व सभासद मंडळी व हितचिंतक यांच्या सहकार्याने सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तीमय वातावरणात पार पडला.

# सीएसआर फंड म्हणजे काय? कोणत्या कंपनीना द्यावा लागतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कंपनी कायदा (Company Act) २०१३ नुसार भारतामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कंपन्यांना सीएसआर कार्यक्रमासाठी एक ठराविक निधी द्यावा लागतो. या निधीच्या माध्यमातून दुर्गम भागातील जनतेसाठी सामाजिक उपक्रम, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण रक्षण अशा अनेक क्षेत्रातील उपक्रम पूर्ण केले जातात.

सीएसआर म्हणजे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिब्लिटी फंड (ऊेीिीरींश डेलळरश्र ठशीिेपीळलळश्रळीूं ऋीपव). नावावरूनच आपल्या लक्षात आलं असेल की, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कंपन्याकडून जो निधी गोळा केला जातो त्या निधीला सीएसआर फंड असं म्हटलं जातं.

कंपनी कायदा २०१३ नुसार भारतामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कंपन्यांना सीएसआर कार्यक्रमासाठी एक ठराविक निधी द्यावा लागतो. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारकडून विशेष असे नियम व काही अटी घालुन देण्यात आली आहेत. भारत हा एकमेव देश आहे जेथे प्रत्येक नफा कमवणाऱ्या कंपनीला सीएसआर उपक्रमासाठी निधी देणे अनिवार्य आहे.

**सीएसआर कोणत्या कंपनीला लागू होतो**

भारतामध्ये कार्यरत असलेल्या ज्या कंपनीची संपत्ती ही ५०० कोटी वा त्याहून अधिक आहे, वार्षिक उलाढाल ही त्या कंपनीची १ हजार कोटी आहे किंवा निव्वळ नफा ५ कोटी रूपये आहे अशा सर्व प्रकारच्या कंपन्यांना सीएसआर निधी उभा करावा लागतो. प्रत्येक कंपनी ही फक्त २ टक्केच निधी देऊ शकते. त्याहून अधिक निधी सीएसआर अंतर्गत स्विकारला जात नाही.

यासाठी कंपनीला अंतर्गत असे सीएसआर बोर्ड स्थापन करावे लागते. त्याअंतर्गत विविध सामाजिक उपक्रम किंवा सेवाभावी संस्थाना सामाजिक दायित्व म्हणून निधी द्यावा लागतो. तसेच कंपनीला आपल्या या उपक्रमा संदर्भातला कृती अहवाल आपल्या संकेतस्थळावर दाखवावा लागतो.

एका संकेतस्थळाच्या पाहणीनुसार, रिलायन्स इंडस्ट्री ही सीएसआर अंतर्गत सर्वाधिक कार्य करत आहे. तर महाराष्ट्रामधुन सर्वाधिक सीएसआर निधी उभा केला जातो. महाराष्ट्र पाठोपाठ कर्नाटक व तामिळनाडू राज्यांचा नंबर लागतो.

**सीएसआर अंतर्गत कोणत्या उपक्रमांना प्राधान्य दिले जाते**

सीएसआर अंतर्गत देशातील जे ज्वलंत प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी, त्यावर पर्याय शोधण्यासाठी कार्य केले जाते. यामध्ये आरोग्य, शिक्षण, समानता, सामाजिक सुरक्षा, पर्यावरण रक्षण, क्रीडा, लष्करी सेवा अशा विविध क्षेत्रांचा समावेश आहे.

आरोग्याशी संबंधित देशातील दारिद्रय निर्मूलन, कुपोषणाची समस्या, साथीच्या आजारांपासून सुटका व्हावी यासाठी प्रतिबंधनात्मक औषधोपचार, स्वच्छता, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या दैनंदिन आयुष्यातील गरजा पूर्ण करतील असे उपक्रमांचा समावेश असतो.

शिक्षणाचा हक्क सर्वांना मिळावा यासाठी संधी उपलब्ध करून देणे, शैक्षणिक संस्था उभारणे वा अशा संस्थांना आर्थिक सहाय्य करणे, आर्थिक वंचित घटकातील विद्यार्थांचे शिक्षण, महिला, दिव्यांग बांधवांचे शिक्षण, योग्य रोजगारासाठी कौशल्यपूर्ण शिक्षण पुरविणे यावर भर दिला जातो.

समाजातील विविध स्तरातील व्यक्तींना विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवणे, पर्यावरणाच्या रक्षणासाठी उपक्रम नियोजित करणे, त्यासंबंधित स्पर्धा, चळवळ उभी करणे, नैसर्गिक साधन-संपत्तीचे जतन करणे, ऐतिहासिक वास्तुंचे जतन करणे, संशोधन क्षेत्रातील संस्थाना आर्थिक सहाय्य करणे, पंतप्रधान वा मुख्यमंत्री आपत्ती निधीला सहाय्य करणे अशा अनेक गोष्टींचा समावेश या यादीमध्ये करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या या मार्गदर्शक तत्वानुसार कंपनी आपल्या आवडीनुसार त्या-त्या सामाजिक क्षेत्रासाठी कार्य करू शकते.

अधिक माहितीसाठी संपर्क साधावा

महा एनजीओ डेव्हलपमेंट असोसिएशन

मुख्य कार्यालय : हिंदवी स्वराज्य भवन, बिद्री मुदाळ तिठ्ठा (बोरवडे), मेन रोड, गारगोटी-कोल्हापूर (महा.) ४१६२०८

Tel: +91 7038702896,

Emall: mnda.mahango@gmail.com, Website: https://www.maharashtrangosamiti.org/

# एल. एल. बी. प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशनला मुदतवाढ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पाच वर्ष कालावधी असलेल्या बी.ए.एल.एल.बी. (विधी) प्रवेशासाठी गुरुवार, दि.२६ जून २०२५ पासून तर पदवी नंतर तीन वर्ष कालावधी असलेल्या एल. एल. बी. (विधी) च्या प्रवेशासाठी सोमवार, दि.३० जून २०२५ पासून ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरु झाली असून ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया गुरुवार, दि. १० जुलै २०२५ पर्यंत करता होती परंतु या कालावधीत अनेक विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे मिळाली नाहीत त्यामुळे अनेक विद्यार्थी हे नोंदणी प्रक्रियेपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे विद्याथ्र्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाकडून तीन वर्ष व पाच वर्ष कालावधी असलेल्या विधी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ दिली असून आता शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ पर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार असून केवळ पैसा आणि वेळ यांचा व्यवस्थित समन्वय साधता न आल्याने शिक्षण घेण्याची इच्छा असतानाही व्यावसायिक शिक्षण घेता येत नव्हते हे पाहून स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी शिक्षणाचे महत्व ओळखले आणि १९९८ साली गोपाळपूर (ता. पंढरपूर) च्या माळरानावर तंत्रशिक्षण संस्था काढली, परिश्रम करत संस्था व्यवस्थित टिकवून ठेवली, त्यात सातत्य राखले. त्यामुळे स्वेरीला शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व यश मिळत राहिले. वाढत्या यशामुळे पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिकांची अपेक्षा वाढली. स्वेरीमध्ये पुढे डिप्लोमा, फार्मसी, एम. बी. ए. एम.सी.ए., पी.एचडी. हे अभ्यासक्रम देखील नागरिकांच्या अपेक्षेनुसार वाढविले. त्यांनाही आता अभूतपूर्व यश मिळत आहे. हे पाहून नागरिकांची अपेक्षा आणखी वाढली आणि पालकांच्या मागणीनुसार विधी (एल.एल.बी.) शिक्षण सुरू करण्याचे ठरविले. स्वेरीतील विधी शिक्षणाचे यंदाचे हे पहिलेच वर्ष असून त्याला शासनाकडून आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाची देखील मान्यता मिळाली आहे. त्यामुळे स्वेरी कॅम्पस मध्ये असलेल्या नव्या इमारतीत हे शिक्षण यंदापासून सुरु होत आहे. शिक्षणासाठी पोषक असलेल्या वातावरणात विधी शिक्षण सुरु होत असल्यामुळे पंढरपूर पंचक्रोशीत भावी वकिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने एल.एल.बी. (तीन वर्ष व पाच वर्षे ) प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून सुधारित वेळापत्रकानुसार आता शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ वाजेपर्यंत ही रजिस्ट्रेशनची प्रक्रिया चालणार आहे. तसेच कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी व निश्चिती (ई-स्क्रुटीनी) करण्यासाठी मंगळवार, दि. ०१ जुलै २०२५ पासून ते मंगळवार, दि. २२ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत मुदत दिली आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्या इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. तसेच 'एमएएच-एलएलबी सीईटी २०२५' ही परीक्षा दिलेली असावी. असे पात्र विद्यार्थी एल.एल.बी. मध्ये प्रवेश घेऊ शकतात. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध आहे. एल.एल.बी.च्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अधिक माहीतीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व प्रा. स्वप्नाली गडदवार (मोबा.नं.-९३७३०२३०९७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**स्वेरीमध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा**



# अहिल्या मेटकरी यांची महसूल सहाय्यकपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील ईश्वर वठार येथील अहिल्या धानाप्पा मेटकरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने महसूल सहाय्यक अधिकारी पदी निवड झाली आहे.

कै.धानाप्पा मेटकरी रा. ईश्वर वठार तालुका पंढरपूर यांची दुतीय कन्या अहिल्या हिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले. व माध्यमिक शिक्षण भैरवनाथ वाडी येथील वामनराव माने प्रशालेत केले. व पदवीधर शिक्षण पंढरपुर येथील कर्मराव भाऊराव पाटील महाविद्यालय येथे झाले .यानंतर कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात मास्टर ऑफ कॉम्प्युटर सायन्स मधून करत आपले शिक्षण पूर्ण केले नंतर वडील , आई यांची होती की आपल्या मुलाने खूप शिकून उच्च पदावर काम करावे आई-वडिलांची हीच इच्छा पूर्ण करण्यासाठी व आपल्यातून हातून जनतेची सेवा घडावी ही इच्छा उराशी बाळगून अहिल्या येणे रात्रंदिवस एक करून आपले यूपीएमपीएससी चे शिक्षण पूर्ण केले. नुकत्याच पार पडलेल्या २०२५ च्या एमपीएससी परीक्षेत यशस्वी झाली . अहिल्यास आई ,वडील, मोठी बहीण तहसीलदार सोनाली चे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे . अहिल्या मेटकरी हिची महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

## २९८ पैकी २४२ गुण मिळवून निफाड तालुक्यात प्रथम

# शिष्यवृत्ती परीक्षेत निफाड वैनतेय विद्यालयाचा अर्णव कडलग तालुक्यात प्रथम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीचा विद्यार्थी अर्णव नितीन कडलग या विद्यार्थ्यांचा तालुक्यात प्रथम क्रमांक आला तर इयत्ता ८ वी साठी असणाऱ्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (जिल्हास्तर शहरी विभागात )पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले आहे.

इयत्ता ५ वी साठी असलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अर्णव नितीन कडलग हा विद्यार्थी २९८ पैकी २४२ गुण मिळवून निफाड तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात ३२वा आला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख वैभव कर्डीले, श्रीमती एम. डी.वाघ, श्रीमती पी. ए.कराड, श्रीमती आर. एस. गायकवाड, ए. एम भामरे यांनी मार्गदर्शन केले.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती

इयत्ता ८ वी साठी असणाऱ्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी याविद्यालयाचे(जिल्हास्तर शहरी) विभागात ४४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ५ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र (धारक) ठरले आहे. शिष्यवृत्ती पात्र ठरलेले ५ विद्यार्थी पुढील प्रमाणे - श्रेया आव्हाड, संस्कार सांगळे, आराध्या शिंदे, ऋषिकेश वाळुंज, अनुष्का घुमरे या यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख श्रीमती एस. एन .पटेल, तसेच शिक्षक श्रीमती एस. एस कापसे, श्रीमती के. डी. सानप, श्रीमती टी. के.राखुंडे, श्रीमती आर डी. पवार, श्रीमती पी. व्ही.भोज यांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा खासदार भास्कर भगरे, पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती नम्रता जगताप, न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त रतन पा. वडघुले, मधुकर राऊत, विश्वास कराड ,वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, माजी प्राचार्य एम एस माळी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे संस्थेचे विश्वस्त अँड आप्पासाहेब उगांवकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, अँड दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड, नरेंद्र नांदे, वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ आदींनी कौतुक केले.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विविध मागण्यासाठी पडघा टोल नाका बंद आंदोलन

## शिवसेना (ठाकरे गट), मनसे व सामाजिक संघटना आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पडघा टोल नाका विरोधात विविध संघटना गेली तेरा वर्षे संघर्ष करत असलेल्या विविध कामांच्या मागण्यांसाठी भिवंडी, शहापूर ,कल्याण तालुक्यातील सर्व शिवसेना (ठाकरे गट) महाराष्ट्र नवनिर्माण सेना इतर सामाजिक

संघटनांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन येत्या १७ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजल्या पासून पडघा प्रवेशद्वार येथून ते पडघा टोल नाका पर्यंत आंदोलन छेडण्यात येणार आहे. तर नागरिकांनी मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन करण्यात आले आहे.

पडघा टोल नाका रस्ता व त्या लगत असलेल्या सर्व्हिस रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करणे, परिसरातील शेरेकरपाडा, डोहोळे, कोशिंबी, बोरिवली, भादाणे सर्व्हिस रोड बनवणे व रोडची दुरुस्ती करणे. भादाणे अंडर पास मध्ये पाणी साचत आहे व त्यामधील रस्ता हा पुर्णपणे खड्डेमय झाला आहे त्याची दुरुस्ती करणे, शेरेकरपाडा येथे अंडर पास बनवणे.

तळवली अंडर पासचा टेंडर दोन वर्षापुर्वी निघाला असून सदरील काम लवकरात लवकर करणे. पडघा कल्याण रस्त्यावरील सापे, तळवली, वाशेरे, आमणे, सावद रस्त्यावर खुप खड्डे पडले आहेत. त्यामुळे सदर रस्त्यावर खुप अपघात होत आहे. त्याची लवकरात लवकर दुरुस्ती व्हावी. अशा मागण्यासाठी पडघा टोल नाका बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. महामार्गावर प्रलंबित असलेल्या कामांसंदर्भात टोलनाका प्रशासनाशी संपर्क साधला असता त्यांनी याविषयी कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाही ,तोपर्यंत पडघा टोल नाका बंदच राहील, कितीही पोलीस, प्रशासनाचा दबाव आला तरी हा मोर्चा निघणारच, असे यावेळी शिवसेना ( ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांनी बोलतांना सांगितले.

आम्ही गेले पंधरा वर्षे विविध मागण्यांसाठी भांडत असतो परंतु लॉजिस्टिक कंपनी समोर अंडरपास आला कुठून या मागे काहीतरी गुपित दडलंय अस मला वाटते असे यावेळी सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे यांनी बोलताना सांगितले. अनेक लोकांचे मृत्यू झाले आंदोलनी झाली म्हणून हा सरळ भाषा समजत नाही आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रशासनाला जाब विचारूया, आणि प्रवाशांचा जीव वाचवूया असे यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांनी बोलताना सांगितले. पडघा हा लॉजेस्टिक हब आहे. इथे लाखो नागरिक नोकरीसाठी येतात.

परतू प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावं लागतो. म्हणून हा आंदोलन सक्रिय करण्यासाठी सर्वांनी यात सहभागी व्हा. असे अँड संदीप जाधव यांनी बोलतांना सांगितले. खड्ड्यांमुळे अजून अपघात



होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सर्वांनी एकत्र या असे रघुनाथ पाटील यांनी बोलतांना सांगितले. यावेळी पडघा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना ( ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर , मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी , सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे,काशिनाथ शेलार, रघुनाथ पाटील, अँड संदीप जाधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हा व मुरबाड तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : गरजवंत विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळावा आणि शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा ठाणे जिल्हा व मुरबाड तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने म. रा. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य संघटक संजयजी भोकरे, राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांच्या मार्गर्शनाखाली दिनांक ९ जुलै २०२५ रोजी मुरबाड तालुक्यातील वैशाखरे केंद्र शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

पत्रकार हा घेणारा नाही तर देणारा असतो. नेहमी इतरांना आपल्या हाताने मदत ही करत असतो. वर्ष भर तो विविध उपक्रम राबवित असतो. असे आमचे पत्रकार आहेत. असे यावेळी राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी बोलताना सांगितले.विद्यार्थ्यांना मुरबाड तालुक्याचा इतिहास माहिती करून द्यावा व तो वहीवर उतरवण्यात यावा, असे मत पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी व्यक्त केले.

पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा सचिव मिलिंद जाधव यांनी आई मला शाळेला जायचं हाय ,आता साक्षर करूया गावं अशा प्रबोधनात्मक कविता सादर केल्या.

यावेळी ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष संतोष गायकर, जिल्हा उपाध्यक्ष वसंत पानसरे , जिल्हा कार्यकारणी सदस्य ड.गीता गायकर ,जिल्हा सचिव मिलिंद जाधव, मुरबाड तालुका अध्यक्ष शेखर भोईर, कल्याण तालुका कार्याध्यक्ष जैतू मुठोळकर, कल्याण तालुका अध्यक्ष योगेश गोडे , सामाजिक कार्यकर्ते इंजि.विजय ऐणकर,उपाध्यक्ष सचिन पोतदार, मुरबाड तालुका सल्लागार सतीश घरत, शहापूर तालुका उपाध्यक्ष संजय भालेराव, कार्याध्यक्ष राजीव चंदने , तालुका सचिव गोविंद भोईर, तालुका सहसचिव नितेश पवार ,कोषाध्यक्ष नरेश म्हाडसे ,सदस्य चंद्रकांत भोईर, कल्याण तालुका अध्यक्ष योगेश गोडे, अँड गीता गायकर, पोलिस पाटील विश्वनाथ नवले, शाळा व्य. समिती अध्यक्ष अंकुश भोईर,मुख्याध्यापक मनोहर घुडे, नंदकुमार इसामे, अश्विनी गोडकर , मनीषा बोरुडे , बाळू हिंदोळा, गोविंद शिद, माधुरी घरत , प्रियंका नवले तर आदी उपस्थित होते.

# आवताडे शुगरचे रोलर पूजन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : चालू गळीत हंगामात पावसाने लवकर सुरुवात केल्याने उसाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होणार असल्याने हंगाम मोठा होणार आहे त्यामुळे सर्वांनी मिळून एक दिलाने येणारा गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडा असा कार्यमंत्र आवताडे शुगरचे चेअरमन संजय आवताडे यांनी कारखान्याच्या रोलर पूजन वेळी बोलताना कारखाना प्रशासनाला दिला.




आवताडे उद्योग समूह संचलित आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा.लि. नंदूर या साखर कारखान्याचा या गळीत हंगाम २०२५-२६ हंगामातील रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन श्री संजय आवताडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

ते बोलताना पुढे म्हणाले की पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांपासून या साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून तीन गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. कोणत्याही साखर कारखान्याच्या यशस्वी वाटचालीमध्ये महत्वपूर्ण असणाऱ्या शेतकरी व ऊस उत्पादकांच्या जीवनामध्ये आर्थिक मार्गाने सुबत्ता आणण्यासाठी आम्ही सार्वजनिक प्रयत्नवादी राहणार आहे. गळीत हंगाम २०२५-२६ साठी कारखाण्याचे वाहनाचे करार पूर्ण झालेले असून पहिल्या हप्ताचे वाटप चालू झालेले असल्याबाबत माहिती देण्यात आली त्याचबरोबर मागील वर्षी जाहीर केलेल्या दरा प्रमाणे सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बिले ही अदा केलेली आहेत. यंदाही आमचा कारखाना दराच्या बाबतीत पाठीमागे राहणार नसून शेतकऱ्यांचे समाधान होईल असा दर देऊन आम्ही कारखाना चालवणार असून अचूक नियोजन आणि उत्कृष्ट प्रशासन यांची सांगड घालून मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी कारखाना जोमाने सुरु होईल आणि गाळप उद्दिष्ट पूर्ण करेल असा विश्वासही चेअरमन संजय आवताडे यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, मारापूरचे सरपंच विनायक यादव, दामाजी कारखान्याचे माजी संचालक विजय माने, भारत निकम, जनरल मॅनेजर सुधीर पाटील, वर्क्स मॅनेजर धैर्यशील जाधव, चिफ केमिस्ट सुनील पाटील, एच आर मॅनेजर ज्ञानेश्वर बळवंतराव, डिस्टिलरी मॅनेजर संभाजी फाळके, परचेस व सेल मॅनेजर मोहन पवार, चिफ अकौंटंट बजरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, आयटी मॅनेजर निलेश रणदिवे, इलेक्ट्रिक मॅनेजर संजय शिंदे, सहा.सुरक्षा अधिकारी रणजीत पवार, अशोक आसबे, अधिकार व कर्मचारी उपस्थित होते.

# १५ जुलै रोजी सांगोला तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण नव्याने जाहीर होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सांगोला तालुक्यातील पहिल्या टप्प्यातील ग्रामपंचायत च्या निवडणुकीचे पडघम येथे दिवाळीमध्ये वाजणार असून त्याआधी या गावचा दावेदार मालक कोण आहे उत्सुकता शिगेला पोचली होती. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका दिवाळीमध्ये घेतल्या जातील असे जाहीर होताच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गेल्या वेळी सरपंच पदाच्या आरक्षण काढल्या होत्या परंतु त्या आरक्षण निवडणूक आयोगाने रद्द दाखल केले आहेत पुन्हा नव्याने आरक्षण सोडतीकडे गावातील पुढारींची लक्ष



लागले होते. गाव पुढाऱ्यांची इच्छा ती आता पुरी होणार आहे. तो दिवस देखील आता ठरलेला आहे सांगोला तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतीच्या २०२५ ते २०३० चा या पंचवार्षिक कालावधीसाठी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम मंगळवार दिनांक १५/७/२०२५ रोजी दुपारी बारा वाजता आयोजित केलेला असून आरक्षण सोडतीचा कार्यक्रम तहसीलदार मा श्री संतोष कणसे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्मृती भवन येथे आयोजित केलेला आहे.

सदर सरपंच पदाचे आरक्षण सोडते पत्र मा श्री तहसीलदार संतोष कणसे यांच्या सैनिक प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर सरपंच आरक्षण परिषदेसाठी सर्व सांगोला तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार श्री संतोष कणसे साहेब यांनी केलेली आहे.

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत डुबेरे जनता विद्यालयाचे घवघवीत सुयश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाने घवघवीत सुयश प्राप्त केले आहे. विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्या. गौरी माणिक वाजे व आरोही भाऊसाहेब जाधव या दोन विद्यार्थिनींची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. सेक्टर सी मध्ये गौरी वाजे प्रथम तर आरोही जाधव हिने तृतीय क्रमांक मिळविला.




विद्यार्थ्यांना डी.ए.रबडे, सोमनाथ गिरी, रेवणानाथ कांगणे,सीमा गोसावी ,विनिता देवरे ,सुनिल ससाणे आदींचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा विद्यालयाच्या वतीने सरपंच रामनाथ पावसे व श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे चेअरमन नारायण वाजे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते .सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर. करपे यांनी केले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत, संस्थेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे ,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, विस्तार अधिकारी कैलास सांगळे, डुबेरे केंद्रप्रमुख विजय निरगुडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक उल्हास पवार वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदींसह शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांनी कौतुक केले आहे.

## जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या विशेष रोजगार मेळावा

## मेळाव्यात सहभागी होण्याचे सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे यांचे आवाहन

# जागतिक युवा कौशल्य विकास दिनानिमित्त १५ जुलै रोजी विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांच्यामार्फत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जागतिक युवा कौशल्य विकास दिन (थेंीश्रव धींीह ड्ढळश्रश्री ऊ) चे औचित्य साधून दिनांक १५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासन संचलित श्री स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या सभागृहात करण्यात आले आहे.

या कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार मेळाव्यामध्ये भारतभर ज्यांचे प्रमाणपत्र चालते अशा मान्यता असलेल्या प्रशिक्षण संस्था सहभागी होणार असून विविध क्षेत्रातील प्रशिक्षणाची सुवर्णसंधी या माध्यमातून युवकांना उपलब्ध होणार आहे. या कार्यक्रमाच्या लाभ घेऊ इच्छिणाऱ्या युवकांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ड्राईंग हॉल इमारत, नॉर्थकोट पार्क, सोलापूर येथे दूरध्वनी क्रमांकः ०२१७-२९९२९५६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती संगीता खंदारे यांनी केले आहे.

सहभागी क्षेत्रे खालीलप्रमाणेः

अ)१. शेती- दुग्धव्यवसाय शेतकरी/उद्योजक, शेळी/मेंढीपालक, सौर पंप तंत्रज्ञ. सेंद्रिय उत्पादक, मशरूम उत्पादक, मधमाश्यापालक २. कपडे-सहाय्यक डिझायनर-कपडे, मेक-अप आणि गृह फर्निचर. स्वयंरोजगार शिंपी, नमुना घेणारा शिंपी ३. सौंदर्य आणि निरोगीपणा- हेअर ड्रेसर आणि स्टायलिस्ट, सहाय्यक सौंदर्य चिकित्सक ४. ऑटोमोटिव्ह-ऑटोमोटिव्ह सेवा तंत्रज्ञ दुचाकी सेवा तंत्रज्ञ, इलेक्ट्रिक वाहन सेवा तंत्रज्ञ-दुचाकी ५. जीएसटी सहाय्यक ६. इलेक्ट्रॉनिक्स आणि हार्डवेअर-इलेक्ट्रिशियन, मोबाइल फोन हार्डवेअर दुरुस्ती तंत्रज्ञ, सीसीटीव्ही स्थापना तंत्रज्ञ, सौर आणि एलईडी तंत्रज्ञ, फील्ड तंत्रज्ञ संगणकीय आणि परिधीय, एलईडी लाईट दुरुस्ती तंत्रज्ञ, सौर पॅनेल स्थापना तंत्रज्ञ ७. अलबिझनेस विश्लेषक ८.आरोग्यसेवा-आपत्कालीन वैद्यकीय तंत्रज्ञ-बेसिक, जनरल ड्युटी सहाय्यक, गृह आरोग्य सहाय्यक ९. मीडिया आणि मनोरंजन- मेक-अप कलाकार, सोशल मीडिया व्यवस्थापक, खाते कार्यकारी १०. ग्रीन जॉब्स-सोलर ईव्ही चार्जिंग उद्योजक, सोलर पीव्ही इंस्टॉलर (सूर्यमित्र), ११. व्यवस्थापन आणि उद्योजकता सचिव, अग्निशमन दल १२. टेलिकॉम- टेरिटरी सेल्स मॅनेजर प्रीपेड/ब्रॉडबँड, टेलिकॉम कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह रिपेअर सेंटर, १३. पर्यटन आणि आतिथ्य- अन्न आणि पेय सेवा सहाय्यक, निवडक २- पेस्ट्री बेकरी कमिशन १४. रबर-कॅड/कॅम डिझायनर- प्लास्टिक उत्पादन १५. पॉवर-इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन.

ब) आर- सिटी संस्थेचे उद्योजकता विकास प्रशिक्षण, शेळीपालन, कृषी व्यवसाय, ब्युटी पार्लर, मोवाईल दुरुस्ती व देखभाल, घरेलू उपकरणे दुरुस्ती, दुचाकी दुरुस्ती, अगरबत्ती बनविणे, नळ फिटिंग व सॅनिटरी काम, प्रवास व पर्यटन मार्गदर्शन, भाजीपाला, रोपवाटिका व्यवस्थापन यासारख्या अनेक प्रशिक्षणाच्या संधी उद्योजकता विकास प्रशिक्षण या कार्यक्रमात युवकांना स्वतःच्या विकासासाठी आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी विविध समाजगटांसाठी कार्यरत असलेल्या महामंडळांचे सहकार्य लाभणार आहे.

कार्यक्रमामध्ये स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या विविध महामंडळांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, युवकांना व्यवसाय संधी, शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये पुढील महामंडळांचा समावेश आहे:

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, महात्मा फुले मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ मर्यादित, दिव्यांग वित्त विकास महामंडळ मर्यादित, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

कौशल्यवान युवा सक्षम भारत या ध्येयाने प्रेरित होऊन, जिल्ह्यातील युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी मिळाव्यात, हेच या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**कार्यक्रम तपशीलः-** दिनांक: १५ जुलै २०२५ वेळ: सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० स्थळ: श्री स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, विजापूर रोड, धर्मवीर संभाजी महाराज उद्यानाजवळ, सोलापूर

## भारतीय जीवन बीमा निगम व गुंज संस्था यांच्या वतीने जायफळ शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी अमर जाधव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जायफळ येथे दिनांक १२/७/२०२५ रोजी भारतीय जीवन विमा निगम व गुंज संस्था दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

भारतीय जीवन बिमा निगम अमेरीका येथे पुरस्कार प्राप्त गोपाळ सुरवसे यांच्या सुसज्य संकल्पनेतुन जायफळ जिल्हा परीषद शाळेतील स्कुल बॅग सह रजिस्टर ,पेंसील बॉक्स खोड रबर ,सह साबन आदी साहित्य देत वृक्षारोपण करुन विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी गुंज संस्थेचे लातूर जिल्हा प्रतिनिधी श्री प्रशांत रणदिवे व भारतीय जीवन विमा निगमचे प्रतिनिधी श्री गोपाळ सुरवसे यांच्या वतीने जायफळ शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जायफळ शाळेचे शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष प्रकाश दिलीप भोंग यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून बिबीशन गरड ब्रॅच मॅनेंजर नितीन कुरुंदकर,तलाठी राजदीप भोसले, ग्रामसेवक यु डी पाटील,मुख्याध्यापक सेलुकर सर, शालेय व्यस्थापण समिती उपाध्यक्ष सौदागर जोगदंड, मल्हारी नंदराम, हरिदास भोंग, नवनाथ भोंग, नाना पवार, खंडु नंदराम, नामदेव जगताप ,अमृत महाराज ,प्रशांत भोंग सह शाळेतील शिक्षक शिक्षीका व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# आषाढी वारीत १०८ रुग्णवाहिका वारकऱ्यांसाठी ठरली जीवनदायी

## १६ हजार ७१६ रुग्णांना १०८ या मोफत रुग्णवाहिका सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रा कालावधीमध्ये वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी डायल १०८ च्या एकूण १२० रुणवाहिका कार्यरत होत्या. त्यासाठी ईओसी (कंट्रोल रुम) कक्ष तयार करण्यात आले होते. त्याव्दारे पंढरपूरातील सर्व भाविकांना २४ तास मोफत सेवा दिली गेली. यात्रा कालावधीत गर्दी मोठ्या प्रमाणात असल्याने मोबाईल नेटवर्कला अडथळे वारंवार येत असल्यामुळे या वर्षी सेवा लवकरात लवकर मिळावी, यासाठी वॉकीटॉकीची सुविधा सर्व रुग्णवाहिकामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली होती. पंढरपूरात अद्यावत असणारी कंट्रोल रुम वॉकीटॉकी सुविधा, जिओ




मॅपींग या सर्व गोष्टीमुळे १०८ रुग्णवाहिका वारकऱ्यांसाठी जीवनदायी ठरली.

आषाढी यात्रेत यावर्षी गंभीर स्वरुपाच्या १२४० रुग्णांना व किरकोळ आजार असणाऱ्या १५ हजार ४७६ रुग्णांना सेवा देण्यात आली. एकूण १६ हजार ७१६ रुग्णांनी १०८ या मोफत रुग्णवाहिका सेवा देण्यात आली.

आषाढी यात्रेचा सांगता समारोप दि. ११ जुलै २०२५ रोजी प्रांताधिकारी कार्यालय येथे करण्यात आला. वारीमध्ये काम करणाऱ्या सर्व डॉक्टर व पायलट व ेल रुममधील सर्व कर्मचाऱ्यांचा प्रशासनाकडून यथोचित सन्मान करण्यात आला. या समारंभास प्रांताधिकारी सचिन इथापे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक धोत्रे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले,आय सी यु इन्चार्ज डॉ. महेश सुडके, डॉ. प्रसन्न भातलवंडे, पुणे विभाग प्रतिनिधी - डॉ. प्रियांक जावळे, सातारा जिल्हा व्यवस्थापक राजेंद्र कदम, सांगली जिल्हा व्यवस्थापक कौस्तुभघाटुळे, सोलापूर जिल्हा व्यवस्थापक अनिल काळे, तसेच सर्व एडीएम, इएमइसओ (डॉक्टर), पायलट कार्यक्रमास उपस्थित होते.

## जि.प .प्रशाला इटकूर येथे गुरू पौर्णिमेनिमित्त माता पिता, गुरू पुजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : जि.प .प्रशाला इटकूर येथे गुरू पौर्णिमा दिवस मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला. या वेळी प्रमुख मार्गदर्शक , ह भ प महादेव महाराज आडसुळ राज्यस्तरीय वारकरी कीर्तन भूषण, सुशील फुलारी शिक्षण विस्तार अधिकारी इटकूर, सोमनाथ चंदनशिवे केंद्रप्रमुख इटकूर, डॉ. रजनीश गाडे वैद्यकीय अधिकारी इटकूर, भारत सोनवणे ग्रामविकास अधिकारी इटकूर, प्रमुख अतिथी-विलास गाडे,उपसरपंच ग्रा.प इटकूर ,कार्यक्रमाचे अध्यक्ष- हरीदास पावले ,अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती इटकूर, हे होते.



या वेळी ह भ प महादेव महाराज, समाजसेवक सुपी सय्यद लातुरकर, सुशील फुलारी शिक्षण विस्तार अधिकारी, या सर्वांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी आप आपल्या पालकांचे व शिक्षकांचे पूजन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल क्षीरसागर सर यांनी केले तर सूत्रसंचालन अंजली यादव मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन शालेय शिक्षण समिती व शाळेचे मुख्याध्यापक सी जी शिंदे सर यांनी केले होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक स्टाफ व विद्यार्थी विद्यार्थिनी व गावकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

## अभ्यासातील सातत्य परिश्रम आणि चिकाटीनेच यशाचे शिखर गाठता येते : सुनील वारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे /प्रतिनिधी : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या संघर्षातून कोलंबिया विश्व विद्यापीठ तसेच लंडन येथील ग्रेज इन संस्थेमधून उच्च शिक्षण प्राप्त केले. (बार्टी)संस्थेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येत असून विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य चिकाटी जिद्द ठेवून परिश्रम करावेत आपली दिशा निश्चित करावी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श समोर ठेवून अभ्यास करावा अभ्यासातील सातत्यामुळेच यशाचे उंच शिखर गाठता येते असे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे अंतर्गत णझडउ निवासी प्रशिक्षण केंद्र येरवडा, पुणे येथील पहिल्या बचचे विद्यार्थी श्री आऩंद सदावर्ते यांनी नुकतेच या वर्षी णझडउ परिक्षेत ९४५ रक मिळवून यश संपादन केले. दिनांक ११ जुलै रोजी श्री सदावर्ते यांनी बार्टी संस्थेस भेट दिली.

यावेळी मा महासंचालक श्री सुनील वारे यांच्या हस्ते श्री आनंद सदावर्ते, तसेच महेन्द्र सदावर्ते यांना भारतीय राज्यघटनेची प्रत, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन सन्मानित करण्यात आले. श्री आनंद सदावर्ते यांनी बार्टी संस्थेने आम्हाला णझडउ प्रशिक्षणा दरम्यान आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या तसेच दर्जेदार प्रशिक्षण दिल्यामुळेच आम्ही यश संपादन केले असल्याचे सांगून त्यांनी बार्टीचे तसेच मा महासंचालक व बार्टीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

आणि पुढील सेवेत बार्टी सोबत काम करणार असल्याचे सांगितले.

श्री आनंद सदावर्ते हे सध्या भारतीय कृषी अनुसंशाधन परिषद अंतर्गत जम्मू आणि काश्मीर येथे प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. तसेच महेन्द्र सदावर्ते हे महाराष्ट्रातील महसूल विभागात तलाठी या पदावर कार्यरत आहेत.

यावेळी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, शुभांगी सुतार, विकास गायकवाड, धिरज खांडे, शुभम सुरवसे,अमिर मुलानी, रणजित पात्रे, महंमद कलाल, रामदास लोखंडे आदी उपस्थित होते..

## दिशा संस्थेकडून ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आश्रमशाळांमध्ये बाल संरक्षण प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूरल प्रतिनिधी/दिनेश घनघाव : शहापूरल तालुक्यातील आश्रमशाळेवर बाल संरक्षण प्रशिक्षण घेण्यात आलं हे प्रशिक्षण अमरावती येथील दिशा स्वयंसेवी संस्था, दुर्लक्षित समुदायाला सक्षम करण्यासाठी कार्य असलेल्या संस्थे ने घेतले, ही संस्था सध्या ठाणे जिल्ह्यात बाल संरक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती करत आहे. २००९ पासून विदर्भात कार्यरत असलेली दिशा संस्था, सध्या महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या (ढऊऊ) सहकार्याने एक महत्त्वपूर्ण बाल संरक्षण प्रणाली राबवत आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमात ७० शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहे समाविष्ट असून, याचा थेट परिणाम ३२,१६८ पेक्षा जास्त मुलांवर होत आहे.

आज, या ध्येयाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून, दिशा संस्थेने आदिवासी विकास विभागाच्या



शहापूर प्रकल्प कार्यालयाच्या सहकार्याने शेणवा आश्रम शाळेत एक विस्तृत प्रकल्प-ओळख अभ्यासवर्ग आणि क्षमता-बांधणी प्रशिक्षण आयोजित केले. या सत्रात मुख्याध्यापक, बाल संरक्षण (उझ) संपर्क अधिकारी आणि वसतिगृह अधीक्षकांना बाल संरक्षणाच्या आवश्यक संकल्पना आणि कायद्यांवर लक्ष केंद्रित करून मार्गदर्शन करण्यात आले.

सहाय्यक काळबांडे, विस्तार अधिकारी शारदा पोकळा , सहाय्यक प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे

विस्तार अधिकारी रवींद्र घोलप प्रकल्प यांच्यासारख्या मान्यवर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण पार पडले. अधिकाऱ्यांनी आश्रमशाळांमधील मुलांची काळजी घेणाऱ्यांवर असलेल्या गंभीर जबाबदारीवर भर दिला आणि दिशा संस्था व प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या.

दिशा संस्थेचे संचालक ड. प्रवीण खांडपासोळे यांनी दोन्ही प्रशिक्षण सत्रांचे नेतृत्व केले आणि बाल संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांना . निखिल चव्हाण, कुंदन बोंद्रे, माधुरी सोनावणे, अनिकेत लोखंडे,सचिन बागुल आणि स्वाती पवार यांच्या समर्पित टीमने सहकार्य केले. हा उपक्रम ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळा आणि वसतिगृहांमधील आदिवासी मुलांसाठी संरक्षणात्मक वातावरण मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## जी.के.एस. महाविद्यालय खडवली अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यातर्फे गुरु पौर्णिमा सोहळा साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /केतन भोज : आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरुपौर्णिमा म्हणून गौरवितो.आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात.व्यासपौर्णिमेच्या दिवशी



- पारमार्थिक या दिवशी भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

गुरुपौर्णिमानिमित्त श्रीमती कविता शिकतोडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि.१० जुलै २०२५ रोजी जी.के. एस.कला, वाणिज्य आणि




'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो.

अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत.दत्तभक्तांसाठी हा पूण्यपावन दिवस ! या दिवशी शिष्य आपल्या गुरुची पंचोपचारे पूजा करतो. आपल्याला मिळालेल्या कृपादानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पूढील वाटचालीसाठी आशिर्वाद घेतो. वेगवेगळ्या पंथ व संप्रदाय हा इश्वरभक्तीकडे जाणारे मार्ग शोधणारे मुमुक्षु

विज्ञान महाविद्यालय खडवली अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांनी गुरु पौर्णिमा सोहळा साजरा केला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयातील उपप्राचार्य प्राध्यापक श्री. प्रशांत तांदळे सर यांनी भूषवले. त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील उपप्राचार्य श्री.शफिक शेख सर,प्राध्यापिका सौ.रसिका लोकरे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आपली उपस्थिती दाखविली.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्राध्यापिका रिया बांगर मॅडम यांनी केले.

विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांचे तसेच शिक्षकांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत व आभार व्यक्त केले.प्रथमेश पितांबरे,कुमारी भार्गवी पितांबरे,नीतू पवार इत्यादी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**पंढरपुरात रा.काँ. अजित पवार गटाची बैठक** — **उमेश पाटील यांचे प्रतिपादन**

# सर्वसामान्यांच्या घरात सत्ताकारण व राजकारण गेले पाहिजे यासाठी पक्ष संघटना मजबूत करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या विकसनशील महाराष्ट्राचा विचार ग्रामीण महापर्यंत पोहोचवण्यासाठी पक्ष संघटना मजबूत करून संघटनेचा उपयोग समाजासाठी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे सोलापूर जिल्ह्याचा डी एन ए हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचाराचा असून आजही सर्वसामान्य जनता आणि कार्यकर्ता राष्ट्रवादीसोबत आहे त्यामुळे आपला सर्वांच्या सोबतीने सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीला गतवैभव मिळवून देणार असल्याचे प्रतिपादन उमेश पाटील यांनी केले.

बैठकीस राष्ट्रवादीची प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा वर्षा राणी शिंदे, महाराष्ट्र युवक प्रदेशचे उपाध्यक्ष समाधान काळे, सरचिटणीस श्रीकांत शिंदे, जिल्हा युवक अध्यक्ष अभिषेक आव्हाड, कार्याध्यक्ष अक्षय भांड, युवती जिल्हाध्यक्ष ऋतुजा सुर्वे तालुका अध्यक्ष अनिल नागटिळक



शहराध्यक्ष दिगंबर सुडके राष्ट्रवादीचे सर्व सेलचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादीचे प्रांतिक सदस्य कल्याण काळे यांनी सांगितलेली गाव खेड्यातील तरुणाईला सोबत घेऊन पक्ष संघटनेच्या माध्यमातून गटातटाचे राजकारण न करता सर्वसामान्य लोकांपर्यंत सरकारच्या लोक कल्याणकारी योजना व कृषी विषयक योजनेची माहिती पोचवून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कृतिशील विचाराची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही फळी तयार करण्याचे काम आपण सर्वांनी करावे.

यावेळी तालुका बार्शी च्या नूतन अध्यक्ष पदी विकास भोसले उपाध्यक्ष संजय व्यवहारे सचिव शरद पवार यांची निवड झाल्याबद्दल बहुळी गावच्या उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल काळे गटाच्या वैशाली संतोष शिंदे यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास सहकार शिरोमणीचे व्हाई चेअरमन भारत कोळेकर, यशवंतराव चव्हाण पतसंस्थेचे चेअरमन शहाजी बापू साळुंखे, प्रतिवादी पतसंस्थेचे चेअरमन विलासराव काळे व्हाईस चेअरमन हरिभाऊ मुजमुले सिताराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक महादेव देते योगेश जाधव पंढरपूर शहर व ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व फलटण सेलचे अध्यक्ष व कार्यकारी सदस्य सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे प्रतिवादी विनागरी सहकारी पतसंस्थे व यशवंतराव चव्हाण पतसंस्थेचे सर्व आजी-माजी संचालक विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान काळे , यांनी केली तर उपस्थितांचे आभार अनिल नागटिळक यांनी मानले.